सुधारित शुध्दीपत्रक

पुणे जिल्हा परिषद पुणे, कृषि विभाग

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ अंतर्गत कृषि विभाग, जिल्हा परिषद, पुणे मार्फत शासनाच्या ५ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयानुसार थेट लाभ हस्तांतरण (DBT) पद्धतीने **७५% अनुदानावर शेतक-यांना ड्रोन (मानव विरहित वायु यान) पुरवठा करणे** ही योजना राबविणेत येणार आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक तालुकयातील आत्मा अंतर्गत नोंदणीकृत शेतकरी गट / शेतकरी उत्पादक कंपनी यांना १ ड्रोन व महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवन्नोत्ती अभियान (MSRLM) अंतर्गत स्थापन झालेला महिला बचत गटाचा प्रभागसंघ यांना १ ड्रोन असे एकुण २६ ड्रोनचा लाभ द्यावयाचा आहे. सदर योजनेच्या मार्गदर्शक सुचना या कार्यालयाकडील पत्र क्रं. जिप/कृषि/ता.-6/12/2026, दिनांक 7/1/2026 अन्वये यापुर्वी प्रसिध्द/निर्गमित करणेत आलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सुचनातील फक्त खाली नमुद केलेल्या बाबींमध्येच बदल करणेत आलेले आहेत.

1.मा. कृषी संचालक (कृषी अभियांत्रिकी संचालनालय), कृषी आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र जा.क्र./कृ.यां.उ.अ./ ड्रोन _ EMP/गुनि5/नक्र245/588-र/2026, दि. 30/07/2026 अन्वये कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत Empanelment करण्यात आलेल्या ड्रोन उत्पादकांच्या सुधारित सूचीतील एका उत्पादकाकडून किंवा त्यांच्या Empanel करण्यात आलेल्या विक्रेत्याकडून Medium Class ड्रोन खरेदी करणे बंधनकारक आहे. तसेच यापुढे वेळोवेळी कृषी आयुक्तालय, पुणे यांचेकडून सुधारित / प्रसिध्द केलेल्या यांत्रिकीकरण योजनांतर्गत Empanelment करण्यात आलेल्या Medium Class ड्रोन उत्पादक/विक्रेता यांचेकडून खरेदी करणे तसेच खालील तांत्रिक निकषाप्रमाणे खरेदी केलेल्या ड्रोनला अनुदानास पात्र राहील.

2.केंद्र शासनाच्या **"NAMO DRONE DIDI"** योजनेच्या धर्तीवर ड्रोन व त्याच्या सोबत देण्यात येणा-या ॲक्सेसरीज व ॲन्युअल मेंटेनन्स कॉन्ट्रॅक्ट, विमा इत्यादी शेतक-यांना उपयोगी गोष्टींचा समावेश या योजनेत नव्याने करणेत आला असून सोबत तांत्रिक निकष जोडणेत आलेले आहेत. असे एकत्रित **ड्रोन पॅकेज मधील वस्तू / साहित्य आणि आनुषंगिक बाबींची सुचविलेली यादीतील बाबींचे एकत्रीत खरेदी करणे बंधनकारक असेल.**

3. ड्रोन खरेदी नंतर सदर ड्रोनची युनिक आयडेंटिफिकेशन नंबर (UIN) ची नोंदणी पोर्टलवर करणे उत्पादक, विक्रेता व लाभार्थी गटास अनिवार्य राहील.

4.सोबत जोडलेले तांत्रिक निकष.

तरी सदर सुधारित शुध्दीपत्रकानुसार आवश्यक ती कार्यवाही करणेत यावी.

(अजित पिसाळ)
कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद, पुणे

(चंद्रकांत वाघमारे)
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

जिल्हा परिषद खरेदी समितीने निश्चित केलेले तांत्रिक निकष

"NAMO DRONE DIDI" योजनेच्या धर्तीवर ड्रोन व त्याच्या सोबत देण्यात येणा-या ॲक्सेसरीज व ॲन्युअल मेंटेनन्स कॉन्ट्रॅक्ट, विमा इत्यादी शेतक-यांना उपयोगी गोष्टींचा समावेश खालील प्रमाणे करणेत आलेला आहे.

Drone and accessories/ancillary charges

S. No.	Suggested list of items/accessories and ancillaries in the Drone package	
A	Drone With Spraying Assembly, 1 Set Batteries, Downward Facing Camera, Dual Channel Fast Battery Charger, 2X Battery Charger Hub with 6 ports, Anemometer, pH meter and Drone Box with 1 year onsite warranty on all items	
B	Additional Items for Drones	
	1	04 Spare Battery sets
	2	01 Spare Propeller Set (Each set contains 6 Propellers)
	3	Petrol Portable Manual Generator (03 KVA)
	4	Centrifugal Nozzle with mounting attachment (Minimum 2 Nos.), Hollow Cone High Pressure Atomizing Nozzle (Minimum 4 Nos) and Flat Jet Spray Nozzle (Minimum 4 Nos.)
	5	Dual Channel Fast Battery Charger
	6	Battery Charger Hub with 6 ports
C	1. RPTO Training with Remote Pilot Certificate from DGCA plus additional flying training of agriculture drone to one member of Farmer Group / FPO/FPC/women SHG 2. Drone assistant training to other member of Farmer Group / FPO/FPC/women SHG	
D	Annual Maintenance Contract (AMC) for 2 years after the expiry of warranty period	
E	Comprehensive Insurance for Drone	
F	Applicable GST	
G	Mandatory Registration of Unique Idenification Number (UIN) of Drone	

"NAMO DRONE DIDI" योजनेच्या धर्तीवर ड्रोन व त्याच्या सोबत देण्यात येणा-या ॲक्सेसरीज व ॲन्युअल मेंटेनन्स कॉन्ट्रॅक्ट, विमा इत्यादी शेतक-यांना उपयोगी गोष्टींचा समावेश खालील प्रमाणे करणेत आलेला आहे.

ड्रोन आणि त्यासंबंधी साहित्य / आनुषंगिक खर्च

अ.क्र.	ड्रोन पॅकेज मधील वस्तू / साहित्य आणि आनुषंगिक बाबींची सुचविलेली यादी	
अ	फवारणी यंत्रणेसह १ बॅटरी संच, खालच्या दिशेने तोंड असलेला कॅमेरा, ड्युअल चॅनेल फास्ट बॅटरी चार्जर, ६ पोर्टसह २ बॅटरी चार्जर हब, अनेमोमीटर, पी.एच. मीटर आणि ड्रोन बॉक्स, सर्व वस्तूंवर १ वर्षाची ऑनसाईट वॉरंटीसह	
ब	**ड्रोनसाठी अतिरिक्त साहित्य**	
	१	०४ सुटे बॅटरी संच
	२	०१ सुटे प्रोपेलर संच (प्रत्येक संचात ६ प्रोपेलर)
	३	पेट्रोलवर चालणारा पोर्टेबल मॅन्युअल जनरेटर (०३ केव्हीए)
	४	माउंटिंग अटॅचमेंटसह सेंट्रीफ्युगल नोझल (किमान २ नग) हॉलो कोन हाय प्रेशर ॲटोमायझिंग नोझल (किमान ४ नग) आणि फ्लॅट जेट स्प्रे नोझल (किमान ४ नग)
	५	ड्युअल चॅनेल फास्ट बॅटरी चार्जर
	६	६ पोर्टसह बॅटरी चार्जर हब
क	१. DGCA कडून रिमोट पायलट प्रमाणपत्रासह RPTO प्रशिक्षण आणि शेतकरी गट / FPO / FPC / महिला बचत गटातील एका सदस्याला कृषी ड्रोनचे अतिरिक्त उड्डाण प्रशिक्षण २. शेतकरी गट / FPO / FPC / महिला बचत गटातील इतर सदस्याला ड्रोन सहाय्यक प्रशिक्षण	
ड	वॉरंटी कालावधी संपल्यानंतर २ वर्षांसाठी वार्षिक देखभाल करार (AMC)	
इ	ड्रोनसाठी सर्वसमावेशक विमा	
फ	लागू असलेला जीएसटी	
ग	ड्रोनच्या युनिक आयडेंटिफिकेशन नंबर (UIN) ची अनिवार्य नोंदणी	

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

Unmanned Aircraft System (UAS) Details	
Category/sub category	Rotocraft (RAPS)
Class and Models	Medium Class
Maximum all-up weight (including payload) in kg	More than 25kg But less than or equal to 150 kg
Intended Application	It is an agriculture drone mainly used for agrochemicals spraying over the crops
अनुदान	खरेदी किंमतीच्या 75% किंवा र.रु. 7.50 लक्ष यापैकी जी रक्कम कमी असेल ते देय राहील.

(अजित पिसाळ)
कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद, पुणे

(चंद्रकांत वाघमारे)
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner